सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी - बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
Website:- https://mahaawaas.com
दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४ Email:- directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./राव्यक-ग्रागृ/बांध/३१०४/२०२३ दि. १४.०२.२०२३

प्रति,
**कार्यकारी अध्यक्ष,**
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा,
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय:-** प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत बांधण्यात आलेल्या डेमो हाऊसमध्ये कॉप-शॉप सुरू करणेबाबत.

**संदर्भ :-** १) महाआवास अभियान ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र:प्रआयो/ प्र.क्र.१०७/ योजना-१०, दिनांक १९ नोव्हेंबर,२०२०
२) महाआवास अभियान २.० बाबतचा ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र: प्रआयो/ प्र.क्र.९३/ योजना-१०, दिनांक १६ नोव्हेंबर,२०२१
३) 'अमृत महाआवास अभियान' बाबतचा ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र: प्रआयो/प्र.क्र.१४९/ योजना-१०, दिनांक १६ नोव्हेंबर,२०२२

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत योजना अंतर्गत ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये गतिमानता व गुणवत्ता वाढीसाठी राज्यात संदर्भ क्र. १ व २ अन्वये 'महाआवास अभियान' राबविण्यात आले तसेच संदर्भ क्र. ३ अन्वये 'अमृत महाआवास अभियान' राबविण्यात येत आहे. अभियानातील एक उपक्रम म्हणून राज्यात तालुकानिहाय / जिल्हानिहाय डेमो हाऊसची निर्मिती करण्यात आली आहे.

सदर डेमो हाऊसमध्ये कॉप-शॉप सुरू करण्याबाबतची चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांचेसमवेत दि. १ डिसेंबर २०२१ रोजी मा. अतिरिक्त मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली बैठक करण्यात आली होती. त्यानुसार संचालक, ग्रामीण गृहनिर्माण व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांचेमध्ये सामंजस्य करार (MOU) करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार त्यावर कार्यवाही होऊन मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग यांचे मान्यतेने MOU अंतिम करण्यात आला आहे. तद्नंतर महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांचेमार्फत कॉप शॉप या उपक्रमाचे व्यवस्थापन करणेकरिता तज्ञ संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे.

आता राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांचे समवेत सामंजस्य करार (MOU) केला आहे. त्यानुषंगाने कॉप-शॉप सुरू करणेकरिता पुढीलप्रमाणे कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

**कार्यकारी अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा-**

१. कॉप-शॉपकरिता तालुका डेमो हाऊस महाराष्ट्र सहकार विकास महामंडळास भाडेतत्वावर उपलब्ध करून देणे.

२. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी तालुकानिहाय बचत गटांच्या उत्पादनांची निवड करून कॉप - शॉपमध्ये विक्रीसाठी उपलब्ध करून देणे

३. डेमो हाऊस अंतर्गत कॉप-शॉप उपक्रम सुरू केल्यानंतर ६ महीने कोणत्याही प्रकारचे भाडे महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांचेकडून घेण्यात येऊ नये. त्यानंतर डेमो हाऊसनिहाय भाडे किमान रु.१०००/- प्रति डेमो हाऊस याप्रमाणे घेण्यात यावे. भाडे देयक (Invoice) दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांना देण्यात यावे.

४. कॉप-शॉप सुरू करणेकरिता लागणारे अनुषंगिक साहित्य जसे की, कपाट, फ्रीज, स्टोरेज आणि इतर फर्निचर संबंधित स्वयंसहायता गट / बचत गट यांनी उपलब्ध करून देण्यात यावे.

५. लाभार्थी अथवा अधिकारी यांच्या क्षेत्रीय भेटीवेळी डेमो हाऊस उपलब्ध करून देणे महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांना बंधनकारक असेल.

**महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ -**

१. राज्यातील सर्व तालुका डेमो हाऊसमधिल कॉप-शॉपमध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत जिल्ह्यातील महिला स्वयंसहायता गट / ग्रामसंघ/ प्रभाग संघ/ व तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था / शेतकरी उत्पादक कंपनी इत्यादींच्या उत्पादनांचे विपणन (Marketing) करणे.

२. कॉप - शॉप या उपक्रमाचे यशस्वी व्यवस्थापन (Professional Management) करणे

३. राज्यातील जिल्हानिहाय प्रसिद्ध उत्पादनांची छाननी करावी व प्रत्येक जिल्ह्यातील उत्कृष्ट उत्पादने राज्यातील प्रत्येक कॉप-शॉपमध्ये उपलब्ध होणेबाबत नियोजन करावे.

४. उत्पादनांची गुणवत्ता व उत्तम दर्जाचे पॅकिंगबाबत पुढाकार घेऊन मार्गदर्शक सूचना तयार करण्यात याव्यात.

५. उत्पादनांची ऑनलाइन स्वरूपात ऑर्डर घेणे व देणेबाबत यंत्रणा विकसित करण्यात यावी.

६. मालमत्ता कर, विमा, वीज देयक, पाणी देयक इत्यादी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांनी भरावे.

७. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांनी भाडे देयकाची अदायगी दर महिन्याच्या १० ते १५ तारखेदरम्यान कार्यकारी अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांना करावी.

८. डेमो हाऊसच्या मुख्य संरचनेमध्ये कोणत्याही प्रकारचा बांधकामविषयक बदल करण्यात येऊ नये. तथापि दर्शनी भागातील खिडकीचा उपयोज हाफ शटर म्हणून करता येऊ शकेल.

९. डेमो हाऊस वर केलेली रंगरंगोटी (Painting / Colouring) तसेच प्लास्टर खराब होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे आपले अधिनस्त प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात बांधण्यात आलेल्या डेमो हाऊस हे कॉप - शॉप सुरू करणेसाठी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळास उपलब्ध करून देणेबाबत सूचना देण्यात याव्यात.

**डॉ. राजाराम दिघे**
संचालक
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

**प्रतिलिपी:**

१. मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व यांना माहितीस्तव सादर.
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
५. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सर्व यांना माहिती व कार्यवाहीस्तव.